क्र. १६२ पहिले वर्ष

१० सप्टेंबर २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील तेविसावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात ख्रिस्त म्हणतो, ''जेथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने जमले आहेत तिथे त्यांच्यामध्ये मी आहे.'' प्रभू येशू आपल्याला सामुदायिक प्रार्थनेचे महत्त्व सांगत आहे. वैयक्तिक प्रार्थनेबरोबर आपल्या कुटुंबात व गावकीत व मुलगामी परिवारात एकत्र येऊन त्याची सहभागिता, प्रेम व जवळीकता अनुभवण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वरा, सर्वसमर्थ बापा, तू आमचे तारण करतोस व ख्रिस्ताबरोबर आम्हाला तुझी मुले बनवतोस. आम्हाकडे दयादृष्टीने पहा. आम्हांला खरे स्वातंत्र्य बहाल कर आणि तू अभिवचन दिलेल्या स्वर्गराज्याचे आम्हांला दान दे. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यहेज्केल या पुस्तकातून घेतलेले वाचन ३३:७–९**

**'' जर दुर्जनाला तू बोलून सावध केले नाहीस तर त्याच्या रक्तपाताला मी तुला जबाबदार धरीन.''**

परमेश्वराचे वचन मला प्राप्त झाले ते असे: ''हे मानवपुत्रा, मी तुला इस्राएल घराण्याचा पहारेकरी नेमले आहे, म्हणून तू माझ्या तोंडचे वचन ऐकून माझ्यावतीने त्यांस सावध कर. हे दुर्जना, तू मरशील असे मी कोणा दुर्जनास म्हटले असता जर त्याला त्याच्या मार्गापासून मागे फिरण्याविषयी तू बोलून त्यास सावध केले नाहीस तर तो आपल्या अधर्मानेच मरेल खरा; पण त्याच्या रक्तपाताला मी तुला जबाबदार धरीन. त्या दुर्जनाने आपल्या मार्गाने फिरावे म्हणून तू त्यास सावध केले असताही तो आपल्या मार्गावरून मागे न फिरल्यास तो आपल्या अधर्मानेच मरेल खरा, पण तुझ्यावर त्याची काही जबाबदारी राहणार नाही.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**९४:१–२, ६–७अबक, ७ड–९**

प्रतिसाद : **आज तुम्ही त्याची वाणी ऐकाल तर किती बरं होईल?**

१. याहो या, आपण परमेश्वराचा जयजयकार करू या. आपल्या तारणदुर्गाचा जयजयकार करू. उपकारस्मरण करीत आपण त्याच्यापुढे जाऊ. स्तोत्र गाऊन त्याचा जयजयकार करू.

२. याहो या, परमेश्वर जो आपला उत्पन्नकर्ता त्याच्यापुढे आपण गुडघे टेकू, त्याची उपासना करू, त्याला नमन करू, कारण तो आपला देव आहे आणि आपण त्याच्या कुरणातील प्रजा, त्याच्या हातचा कळप आहो.

३. आज तुम्ही त्याची वाणी ऐकाल तर बरे होईल? मरीबा येथल्याप्रमाणे, रानात मस्सा येथील प्रकरणाच्या दिवशी केल्याप्रमाणे तुम्ही आपली मने कठोर करू नका. तेव्हा तुमच्या वडीलांनी जरी माझी कृती पाहिली होती तरी त्यांनी माझी परीक्षा पाहिली आणि मला पारखले.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन १३:८–१०**

**''प्रीती हे नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन होय.''**

एकमेकांवर प्रीती करणे ह्याशिवाय कोणाच्या ऋणात राहू नका. कारण जो दुसऱ्यावर प्रीती करतो त्याने नियमशास्त्र पूर्णपणे पाळले आहे. कारण ''व्यभिचार करू नकोस, खून करू नकोस, चोरी करू नकोस, लोभ धरू नकोस'' ह्या आज्ञांचा आणि दुसरी कोणतीही आज्ञा असली तर तिचाही सारांश.'' जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यांवर प्रीती कर'' ह्या वचनात आहे. प्रीती शेजाऱ्यांचे काही वाईट करत नाही म्हणून प्रीती हे नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन होय.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**लूक २१:३६**

**आलेलुया, आलेलुया!**

मनुष्याच्या पुत्रासमोर उभे रहावयास तुम्ही समर्थ व्हावे म्हणून सर्व प्रसंगी प्रार्थना करत जागृत राहा.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १८:१५–२०**

**''त्याने तुझे ऐकले तर तू आपला भाऊ मिळवलास, असे होईल.''**

येशू आपल्या शिष्यांस म्हणाला, तुझ्या भावाने तुझा अपराध केला तर त्याच्याकडे जा, तुम्ही दोघे एकांती असताना त्याचा अपराध त्याला दाखव. त्याने तुझे ऐकले तर तू आपला भाऊ मिळवलास असे होईल. परंतु त्याने जर ऐकले नाही तर तू आणखी एकदोघांस आपणाबरोबर घे. अशासाठी की, दोघा किंवा तिघा साक्षीदारांच्या तोंडून प्रत्येक शब्द शाबीत व्हावा आणि जर त्याने त्यांचे ऐकले नाही तर मंडळीला कळव आणि जर त्याने मंडळीचेही ऐकले नाही तर तो तुला परराष्ट्रीय किंवा जकातदार ह्यांच्यासारखा होवो. मी तुम्हांस नक्की सांगतो, जे काही तुम्ही पृथ्वीवर मोकळे कराल ते स्वर्गात मोकळे केले जाईल. मी आणखी तुम्हांला नक्की सांगतो, पृथ्वीवर तुमच्यापैकी दोघे कोणत्याही गोष्टीविषयी एकत्रित होऊन विनंती करतील तर ती माझ्या स्वर्गाच्या पित्याकडून त्यांच्यासाठी केली जाईल. कारण जेथे दोघे किंवा तिघे

माझ्या नावाने जमले आहेत तेथे त्यांच्यामध्ये मी आहे.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद – **ऐक प्रार्थना प्रभू देवा.**

१. ख्रिस्तसभेच्या सर्व धार्मिक नेत्यांना प्रभूचे कार्य अखंडीतपणे पूर्णत्वास नेण्यास चांगले आरोग्य व मानसिक स्वास्थ्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या धर्मग्रामातील गरीब व निराधारांना चांगले आरोग्य व दैनंदिन जीवनात शांती मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आपल्या पॅरिशमधील जे लोक दारूच्या आहारी गेले आहेत त्यांना दारूमुळे समाजावर, कुटुंबावर आणि प्रकृतीवर होणाऱ्या हानीची जाणीव होऊन दारू सोडण्यास सुबुध्दी मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी, प्रार्थना करूया.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्याचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे शांतिप्रिय व प्रेमळ परमेश्वरा, आमचे हे समर्पण तुझी खरी उपासना बनव व तुझ्याबरोबर आमचे ऐक्य घडवून आण. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तुझे शब्द व तुझे संस्कार आमचे अन्न व जीवन आहे. तुझ्या पुत्राकडून मिळालेले हे दान आम्हाला सार्वकालिक जीवनात सहभागी होण्यास समर्थ करो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

मत्तय ह्या शुभवर्तमानकाराने येशूची शिकवण पाच प्रवचनांच्या रूपाने सादर केलेली आहे. त्यात पर्वतावरील प्रवचन (अध्याय ५-७), प्रेषितकार्यावरील प्रवचन (अध्याय १०), देवराज्याविषयीच्या दाखल्यांसहित प्रवचन (अध्याय १३), सामुदायिक जीवनाविषयी प्रवचन (अध्याय १८), युगाच्या समाप्तीविषयीचे प्रवचन (अध्याय २४-२५) ह्यांचा समावेश होतो. आजच्या शुभवर्तमानात (मत्तय १८:१५-२०) येशू सामुदायिक जीवनाविषयी मार्गदर्शन करीत असल्याचे दिसून येते. खरे पाहता, आजची तिन्ही वाचने ख्रिस्ती जीवनाच्या सामुदायिक अंगांवर प्रकाश टाकतात.

**अ) आजच्या पहिल्या वाचनात (यहेज्केल ३३:७-९)** संदेष्टा आपल्या लोकांना एकमेकांच्या जीवनाच्या नैतिक जबाबदारीविषयी मार्गदर्शन करतो. मनुष्य हा एखाद्या निर्जन बेटासारखे जीवन जगू शकत नाही. एकाच्या वर्तणुकीचा भला बुरा परिणाम दुसऱ्याच्या जीवनावर होतोच. त्यामुळे दुर्जनाला त्याच्या पापापासून दूर करण्यासाठी झटणे ह्याची नैतिक जबाबदारी सज्जनावर येऊन पडते. ही जबाबदारी टाळणाऱ्या सज्जनाचा जीव धोक्यात असतो असे संदेष्टा परखडपणे सांगतो.

**ब) दुसऱ्या वाचनात** संत पौल रोमकरांस (१३:८-१०) मार्गदर्शन करताना एकमेकांवर प्रेम करणे म्हणजे एकमेकांचे ऋण फेडणे असे समीकरण करतो.

**क) शुभवर्तमानात (मत्तय १८-२०)** सामुदायिक जीवन जगत असताना संघर्षाची परिस्थिती निर्माण झाल्यास एकूण चार टप्प्यात समेटाचा मार्ग चोखाळण्याचे मार्गदर्शन करतो. व्यक्तिशः समजूत काढणे, दोघा साक्षीदारांकरवी समज देणे, ख्रिस्तसभेतील यंत्रणेची मदत घेणे आणि शेवटी संबंधित व्यक्तीवर निर्णय सोपवून तिच्यासाठी प्रार्थना करणे. मात्र एवढे सारे करूनही ती व्यक्ती समेटास तयार होत नसेल तर तिच्या ह्या वागण्याचा प्रभाव आपल्यावर पडू नये म्हणून तिला परराष्ट्रीय किंवा जकातदार ह्यांच्यासारखे आपल्यापासून दूर ठेवणे उचित असल्याचा निर्वाळाही येशूने दिलेला आहे.

**आत्मपरीक्षण :** सामुदायिक जीवन जगत असताना मला कोणकोणत्या संघर्षमय परिस्थितीला सामोरे जावे लागते? त्या परिस्थितीत मी कोणकोणती पावले उचलतो?

●●●

| सप्टेंबर २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ११ | सं पाफ्नेशियस महान (हि) | : कलस्सैकरांस १:२४-२:३/लूक ६:६-११ |
| मंगळ १२ | मरियेचे पवित्र नाव (हि) | : कलस्सैकरांस २:६-१५/लूक ६:१२-१९ |
| बुध १३ | सं योहान ख्रिसोस्तोमुस (पां) | : कलस्सैकरांस ३:१-११/लूक ६:२०-२६ |
| गुरू १४ | पवित्र क्रूसाचा विजयोत्सव (तां) | : गणना २१:४-९/योहान ३:१३-१७ |
| शुक्र १५ | दु:खी माता मरिया (पां) | : १ तिमथी. १:१-२, ५, ७-८,११/लूक ६:३९-४२ |
| शनि १६ | कॉर्नेलियुस व सिप्रियन (तां) | : १ तिमथी. १:१५-१७/लूक ६:४३-४९ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)